International Journal of Classified Research Techniques & Advances (IJCRTA)
Multidisciplinary Peer-Reviewed Online Open Access Journal Impact Factor: 5.8
Volume 5, Issue 1, Jan-March 2025 ID: IJCRTA0000168 ISSN: 2583-1801
Email: ijcrta@gmail.com Website: www.ijcrta.org

# लाडकी बहीण योजना: राजकारण आणि राज्याचा आर्थिक समतोल

**सचिन अशोक निकम**

**Author Affiliation:**
विद्यार्थी, एम. ए. राज्यशास्त्र, छत्रपती संभाजीनगर. (औरंगाबाद)-431001
Email: sanikam.2@gmail.com

**Citation of Article:** निकम, एस. ए. (2025). लाडकी बहीण योजना: राजकारण आणि राज्याचा आर्थिक समतोल. International Journal of Classified Research Techniques & Advances (IJCRTA) ISSN: 2583-1801, 5 (1), pg.22-25. ijcrta.org

**सारांश:**

लाडकी बहीण योजना ही महाराष्ट्र सरकारने 2024 मध्ये जाहीर केलेली एक महिला आर्थिक सक्षमीकरण योजना आहे. या योजनेअंतर्गत राज्यातील महिलांना दरमहा ₹1,500 अनुदान दिले जाणार आहे, ज्यामुळे त्यांना आर्थिक मदत मिळेल आणि त्यांचा रोजगार, आरोग्य आणि शिक्षणासाठी खर्च करणे सुलभ होईल.

**प्रस्तावना:**

महाराष्ट्र शासनाने महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी आणि त्यांच्या आरोग्य व पोषणाच्या सुधारण्यासाठी "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण" योजना जुलै २०२४ मध्ये सुरू केली. या योजनेअंतर्गत, राज्यातील २१ ते ६५ वयोगटातील पात्र महिलांना दर महिन्याला ₹१,५०० थेट त्यांच्या बँक खात्यात जमा केले जातात. या योजनेचा उद्देश स्त्रियांच्या आर्थिक सबलीकरणास हातभार लावणे हा आहे. तथापि, या योजनेमुळे राज्याच्या आर्थिक समतोलावर आणि राजकीय स्वार्थांवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. महाराष्ट्र सरकारने जाहीर केलेली लाडकी बहीण योजना ही राज्यातील महिलांना आर्थिक मदत देण्याची महत्त्वाकांक्षी योजना आहे. महिलांचे आर्थिक सक्षमीकरण आणि सामाजिक स्थैर्य वाढवण्याच्या उद्देशाने ही योजना आखण्यात आली आहे. मात्र, ही योजना जाहीर होताच ती राजकीय चर्चेचा आणि आर्थिक गणितांचा केंद्रबिंदू बनली आहे.

एकीकडे, सरकार ही योजना महिलांसाठी स्वावलंबनाची संधी असल्याचे सांगते, तर दुसरीकडे विरोधक याला लोकलुभावन योजना आणि आर्थिक ताण वाढवणारी संकल्पना मानतात. या पार्श्वभूमीवर या योजनेचा राजकारणावर आणि राज्याच्या आर्थिक समतोलावर होणारा प्रभाव तपासणे गरजेचे आहे.

**राज्याची आर्थिक स्थिती आणि कर्जबोजा:**

महाराष्ट्र राज्याची आर्थिक स्थिती आधीच नाजूक आहे. भारताचे नियंत्रक आणि महालेखापाल (CAG) यांच्या अहवालानुसार, राज्यावर मोठ्या प्रमाणात कर्ज आहे, आणि २०३० पर्यंत हे कर्ज ₹२.७३ लाख कोटींवर पोहोचण्याची शक्यता आहे. या कर्जाच्या परतफेडीसाठी राज्याच्या तिजोरीवर मोठा भार पडणार आहे. अशा परिस्थितीत, नवीन योजनांसाठी निधी उभारणे हे सरकारपुढे मोठे आव्हान आहे.

International Journal of Classified Research Techniques & Advances (IJCRTA)
Multidisciplinary Peer-Reviewed Online Open Access Journal Impact Factor: 5.8
Volume 5, Issue 1, Jan-March 2025 ID: IJCRTA0000168 ISSN: 2583-1801
Email: ijcrta@gmail.com Website: www.ijcrta.org

आज महाराष्ट्राची लोकसंख्या १४ कोटी असून भौगोलिक क्षेत्रफळ भारताच्या दहा टक्के आहे. याचा अर्थ महाराष्ट्र लोकसंख्या व क्षेत्रफळ यात देशाच्या दहा टक्के आहे. मात्र, महाराष्ट्राचे राज्य उत्पन्न देशाच्या १४ टक्के म्हणजे सर्वाधिक आहे. आगामी काही वर्षांत भारताला पाच लाख कोटी डॉलरची (फाइव्ह ट्रिलियन) अर्थव्यवस्था हा पंतप्रधानांचा कायम घोष असतो. त्यात महाराष्ट्राचा हिस्सा एक ट्रिलियन म्हणजे २० टक्के अपेक्षित आहे. 'आर्थिक पाहणी अहवाल २०२३-२४' च्या आकडेवारीनुसार त्या वित्तवर्षात राज्यउत्पन्न ४० लाख ४५ हजार कोटी रुपये होते. सेवा क्षेत्राचा हिस्सा ५७.१, उद्योगक्षेत्र ३०.९ आणि शेतीक्षेत्र १२ टक्के असा होता. ४६ टक्के लोक शेतीत काम करतात. परंतु त्यांच्या वाट्याला जेमतेम १२ टक्के राज्य उत्पन्न जाते. ते अत्यंत अपुरे आहे.

आज राज्यात १० कोटी लोक कष्टकरी आहेत. त्यांची अवस्था अत्यंत दयनीय आहे. असे असताना राज्याच्या यंदाचा अर्थसंकल्प सहा लाख १२ हजार २९३ कोटी खर्चाचा आहे. यात राज्याचा स्वत:चा महसूल ५२.१२ टक्के असून तो सर्व पगार (२४ टक्के), निवृत्तीवेतन (११ टक्के), कर्जावरील व्याज देणे (९ टक्के) आणि कर्ज परतफेड (९ टक्के) यात फस्त होणार! याखेरीज वेगवेगळी अनुदाने, एसटी, वीजमंडळे व सार्वजनिक उपक्रमांचा तोटा यासाठी मोठी तरतूद केली जाते. २०२४-२५ च्या बजेट तरतुदीनुसार माझी लाडकी बहीण, दहा लाख युवकांना दरमहा १० हजार, ४४ लाख शेतकऱ्यांना मोफत वीजपुरवठा, ५२ लाख कुटुंबांना वर्षाला तीन मोफत गॅस सिलिंडर आदि योजनांवर एक लाख कोटी रुपये खर्ची पडतील.

या सवंग तरतुदींनी महिला, युवक शेतकरी व गरिबांचे प्रश्न सुटणार नाहीत. आजही ७० टक्के जनता वंचित, उपेक्षित, अभावग्रस्त, हिंसा, अन्याय व शोषणाची बळी असताना शासनकर्ता वर्ग त्यांच्या सत्तासंपत्ती उपभोगात मश्गुल राहतो. खेदाची बाब म्हणजे न्यायपालिका सक्रिय भूमिका बजावत नाही. वेळोवेळी खटला व प्रसंगनिहाय काही आदेश, निर्देश देणे एवढेच करुन न थांबता देशातील १०० कोटी व महाराष्ट्रातील दहा कोटी लोकांना पशूपेक्षा वाईट अवस्थेत जगावे लागते, याची दखल घेऊन शासन-प्रशासन व्यवस्थेस कालबद्ध कृती करण्याचे आदेश देऊन त्याच्या अंमलबाजवणीत न्यायपालिकेने सक्रिय भूमिका बजावणे ही काळाची गरज आहे. सोबतच यासाठी प्रत्येक नागरिकाने न्यायव्यवस्थेकडे व्यक्तिगत व सामूहिक विनंती अर्ज, याचिका केल्या पाहिजे. महाराष्ट्रासह देशाची स्थिती विदारक असून नैसर्गिक संसाधने (जमीन, पाणी, वने, कुरणे, जैवविविधता) उद्ध्वस्त होत आहेत. सोबतच मानव अधिकारांचे हनन होत आहे. महाराष्ट्रात आज सरकारला मनरेगाचा विसर पडला आहे. दिवसाला ३०० रुपये मिळविण्यासाठी काबाडकष्ट करण्यास कोट्यवधी लोक तयार आहेत. पण त्यांना काम उपलब्ध करून दिले जात नाही. सरकार जेलमध्ये दरेक कैद्यावर रोज ५०० रुपये खर्च करते. मात्र तेवढ्या मोबदल्याचा रोजगार पुरवत नाही. उलट, लोकांना पंगू बनविणाऱ्या तरतुदी केल्या जातात.

आपल्या देशात निसर्गाला उद्ध्वस्त व श्रमिकांचे शोषण करणारा वाढवृद्धी ढाचा (ग्रोथ स्ट्रक्चर) पोसला जात आहे. सोबतच ग्रामीण व शहरी श्रीमंतावर संपत्ती व वारसा करदेखील लावण्यास सत्ताधारी कचरतात. सध्या भाराभर खैरात, अनुदान, आरक्षण तरतुदी व योजनाद्वारे जनतेचे भौतिक जीवन सुधारणे शक्य नाही. आजवरच्या विकासात एक सरंजामी-भांडवली-बांडगुळी व्यवस्था पोसली गेली आहे. केवळ प्रत्येक जातीतला मलईदार वर्ग जोपासला गेला. आर्थिक पाहणीत नमूद केल्यानुसार राज्याची २० टक्के लोकसंख्या झोपडवस्तीत आहे. शिक्षण व आरोग्याची अवस्था दयनीय आहे. मानवविकास निर्देशांकात महाराष्ट्र मागेच आहे.

**योजनेवर होणारा खर्च आणि राजकीय स्वार्थ:**

"लाडकी बहीण" योजनेअंतर्गत सुमारे २.५ कोटी महिलांना लाभ देण्याची योजना आहे. यासाठी वार्षिक अंदाजे ₹४५,००० कोटींची तरतूद आवश्यक आहे. जर दर महिन्याला देण्यात येणारी रक्कम ₹२,१०० करण्यात आली, तर हा खर्च वाढून ₹६३,००० कोटी होईल. या योजनेची घोषणा आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर करण्यात आली असल्याने, ती मतदारांना आकर्षित करण्यासाठीचा राजकीय डाव असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

**भविष्यातील धोके:**

अशा योजनांमुळे राज्याच्या तिजोरीवर अतिरिक्त भार पडतो, ज्यामुळे इतर महत्त्वाच्या क्षेत्रांवरील खर्चात कपात करावी लागते. उदाहरणार्थ, जिल्हा नियोजन समित्यांच्या (DPC) निधीत कपात करण्यात आली आहे, ज्यामुळे स्थानिक विकासकामांवर परिणाम होऊ शकतो.

**इतर राज्यांतील अनुभव:**

मध्य प्रदेशात "लाडली बहना" नावाची योजना राबविण्यात आली होती, ज्यामुळे तेथील निवडणुकांवर परिणाम झाला. तथापि, अशा योजनांमुळे राज्याच्या आर्थिक स्थितीवर ताण येतो, आणि दीर्घकालीन आर्थिक विकासावर परिणाम होऊ शकतो.

**प्रलंबित योजना आणि आर्थिक अनुशेष:**

राज्यातील अनेक महत्त्वाचे प्रकल्प आर्थिक कारणास्तव प्रलंबित आहेत. शिक्षण, आरोग्य, रोजगार, शेती या क्षेत्रांमध्ये राज्याचा अनुशेष भरून काढण्यासाठी निधीची आवश्यकता आहे. अशा परिस्थितीत, नवीन योजनांसाठी मोठ्या प्रमाणात निधी खर्च करणे हे राज्याच्या आर्थिक समतोलासाठी धोकादायक ठरू शकते.

**तज्ज्ञांची मते:**

अर्थतज्ज्ञांच्या मते, अशा योजनांमुळे राज्याच्या तिजोरीवर अनावश्यक भार पडतो, ज्यामुळे दीर्घकालीन आर्थिक विकासावर परिणाम होतो. बाळासाहेब आंबेडकर, सुखदेव थोरात, आणि निर्मला सीतारामन यांसारख्या तज्ज्ञांनीही अशा योजनांच्या आर्थिक परिणामांबाबत चिंता व्यक्त केली आहे.

**1. अर्थशास्त्रज्ञांचे मत:**

काही अर्थतज्ज्ञांच्या मते, लाडकी बहीण योजना ही महिलांसाठी सकारात्मक पाऊल असले तरी, दीर्घकालीन आर्थिक दृष्टीने टिकाऊ नाही. राज्याच्या तिजोरीवर प्रचंड ताण येईल कारण या योजनेसाठी वार्षिक हजारो कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. याऐवजी, महिला उद्योजकता, रोजगार निर्मिती आणि कौशल्यवृद्धीवर भर देणे गरजेचे आहे, जेणेकरून त्या स्वतः उत्पन्न कमवू शकतील.

**2. सामाजिक कार्यकर्त्यांचे मत:**

महिलांना थेट आर्थिक मदत मिळणे हे त्यांच्या सक्षमीकरणासाठी उपयुक्त ठरू शकते. विशेषतः ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांसाठी ही योजना उपयोगी पडेल. मात्र, अनुदानाच्या वितरणात पारदर्शकता आणि अंमलबजावणीच्या अडचणी दूर करणे आवश्यक आहे.

**3. राजकीय विश्लेषकांचे मत:**

मतांसाठी लोकलुभावन योजना आणण्याचा आरोप सतत होत आहे. योजनेमुळे महिला मतदारांचा कल बदलू शकतो, त्यामुळे ती निवडणूक राजकारणाचा एक भाग असल्याचे सांगितले जाते. सरकारने राजकीय फायद्यापेक्षा दीर्घकालीन धोरणांवर भर द्यायला हवा.

**निष्कर्ष:**

"लाडकी बहीण" योजना ही राजकीय स्वार्थ साधण्यासाठी आणलेली योजना असल्याचे दिसते. या योजनेमुळे राज्याच्या तिजोरीवर अतिरिक्त भार पडत असून, इतर लोकोपयोगी योजनांच्या निधीत कपात करावी लागत आहे. त्यामुळे, ही योजना राज्याच्या आर्थिक समतोलासाठी धोकादायक ठरू शकते. तज्ज्ञांच्या मते, लाडकी बहीण योजना काही प्रमाणात फायदेशीर ठरू शकते, पण राज्याच्या आर्थिक शिस्तीवर परिणाम होऊ शकतो. अनुदान देण्याच्या ऐवजी, महिलांना रोजगार आणि शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्यास अधिक चांगले परिणाम मिळू शकतील.

**संदर्भ सूची:**

1. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2023-24: प्रकाशक: महाराष्ट्र शासन, अर्थ व सांख्यिकी संचालनालय
2. भारताचे नियंत्रक आणि महालेखापाल (CAG) अहवाल: प्रकाशक: भारत सरकार
3. महाराष्ट्र राज्य वित्त लेखापरीक्षण अहवाल 2022-23: प्रकाशक: भारताचे नियंत्रक आणि महालेखापाल
4. "भारतीय अर्थव्यवस्था":लेखक: रमेश सिंग
5. "अर्थात": लेखक: अच्युत गोडबोले
6. Maharashtra Economic Survey Report 2023-24: महाराष्ट्राचे राजकीय अर्थकारण. प्रा. एच. एम. देसरडा